# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नासिक

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद (School Council)

बैठक क्र.51 दि. 17.01.2019

इतिवृत्त –

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 51, दि. 17.01.2019 रोजी सकाळी 11.30 ते 5.00 या वेळेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील शैक्षणिक इमारतीमधील संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांचे दालनात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

1. डॉ. कविता साळुंके – अध्यक्ष, प्र.संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
2. डॉ. संजिवनी महाले — सदस्य व सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद
3. प्रा.डॉ. एस.व्ही. चौधरी – सदस्य, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी , न्यू दिल्ली
4. डॉ. चंद्रकांत बोरसे – सदस्य, प्राचार्य, म.वि.प्र.चे बी.एड. कॉलेज, नाशिक
5. प्रा. डॉ. जयदिप निकम -- सदस्य, प्र.संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा
6. प्रा. माधव पळशीकर -- सदस्य, प्राध्यापक, संगणकशास्त्र विद्याशाखा
7. डॉ. हेमंत राजगुरु – सदस्य, प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग
8. डॉ.विजया पाटील- प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
9. प्रा. विजयकुमार पाईकराव सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
10. ॲडव्होकेट मिलिंद बाबर— निमंत्रित सदस्य, नासिक
11. श्री. शिवानंद कहाळेकर— निमंत्रित सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
12. श्री. ज्ञानेश्वर जाधव — निमंत्रित सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,

बैठकीस खालील सहा सदस्य त्यांच्या वैयक्तिक अडचणींमुळे उपस्थित राहू शकले नाही.

- डॉ. अरुण जवळेकर -- सदस्य, प्राचार्य, चेंबुर बी.एड. कॉलेज, चेंबूर, मुंबई
- डॉ. आर.बी. मानेकर-- सदस्य, प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकोला
- प्रा. प्रा.डॉ. उर्मिला धूत -- सदस्य, प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, परभणी
- प्रा. डॉ. सुरेश पाटील -- सदस्य, प्राध्यापक, संचालक,मूल्यमापन विभाग
- डॉ. डी.डी. पवार सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
- डॉ. सुभाष सोनूने — सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,

इतिवृत्त :

| क्रमांक | उप क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| 51.1 | | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 01**<br>**उपस्थित सदस्यांचे स्वागत करण्यात आले.** |
| 51.2 | | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 02**<br>**बैठक क्र. 50 च्या परिषदेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.** |
| 51.3 | | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 03**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 50 च्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| 51.4 | 51.4.1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 04**<br>**विषय** : - विद्याशाखेतील घडामोडींची माहिती देणे.<br>**निर्णय** — विद्याशाखेमध्ये सध्या सुरु असलेल्या शिक्षणक्रमांच्या पूर्नरचना आणि इतर घडामोंडीची माहिती सभेस देण्यात आली. |
| | 51.4.2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 05**<br>**विषय** : बी.एड. 2019-20 तुकडीच्या प्रवेश नियमातील बदलास मान्यता देणे<br>**टिप्पणी**- बी.एड प्रवेशासाठी मुक्त विद्यापीठातून पूर्वी प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी व संशोधन पदवीस अतिरिक्त गुण देण्यात येत होते. मात्र सन 2019-20 तुकडी पासून गुण न देण्यास तसेच इतरही प्रवेश नियमांना मान्यता देणेसाठी सादर ..<br>**निर्णय** — बी.एड. 2019-20 तुकडीच्या प्रवेश नियमातील बदलाबाबत —मुक्त विद्यापीठातून प्राप्त केलेल्या विविध शिक्षणक्रम अतिरीक्त गुण देणे बंद करावयाचे असल्यास विद्यापीठातील इतर विद्याशाखांना त्या संदर्भात एक वर्ष आधी कळवून नंतर ते अतिरीक्त गुण देणे बंद करावे असे सुचित करुन इतर नियमांना मान्यता देण्यात आली. विद्वत परिषदेपुढे पाठविण्याची शिफारस करण्यात आली. |
| | 51.4.3 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 06**<br>**विषय** - एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमातील संशोधन अहवाल मूल्यमापनातील केसवर चर्चा व निर्णय<br>**टिप्पणी** : एम.ए. (शिक्षणशास्त्र) च्या विद्यार्थ्यांनेच संशोधन अहवाल मार्गदर्शक म्हणून कार्य केलेले निदर्शनास आल्याने ही केस परीक्षा विभागाकडे सदर बाब (कॉपी केस कमिटी)<br>पाठविण्यात आली होती. मात्र त्यावर शिक्षणशास्त्र विद्याशाखेनेच निर्णय घ्यावा असे कळविण्यात आलेले आहे.<br>**निर्णय** - एम.ए. शिक्षणशास्त्र **शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र- श्री. बालाजी अध्यापक महाविद्यालय, जांभरुण परांडे,ता.जि. वाशिम. (1522A) मधील श्री. दिगंबर भगवान घोडके** यांनी प्रबंध सादर केला होता. विद्यापीठाच्या परिशिलन समितीच्या निरीक्षणानूसार श्री. घोडके हे विद्यार्थी असून मार्गदर्शक म्हणून एकूण 6 विद्यार्थ्यांच्या प्रबंधावर गाईड म्हणून स्वाक्षरी केली आहे. विद्यापीठ नियमानूसार विद्यार्थी असतांना मार्गदर्शक (गाईड) म्हणून कार्य करता येत नाही. सदर विषय विद्याशाखा परिषदेत ठेवण्यात आला होता.<br>सदर विषय दि. 17.01.2019 रोजी आयोजित केलेल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेमध्ये ठेवण्यात आला. त्यामध्ये ही बाब परिक्षेशी संबधित असल्याने ' परीक्षा विभागानेच' निर्णय घ्यावा असे सूचित करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| | 51.4.4 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 07**<br>**विषय :A-** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या पूर्नेरचित अभ्यासक्रमास मंजूरी देणे<br>**टिप्पणी :** या शिक्षणक्रमाची पूर्नरचना करण्यात आलेली आहे. त्यात पाच अभ्यासक्रम ठेवण्यात आलेले आहे. शिक्षणक्रम संरचना सहपत्र क्र. 4 मध्ये सविस्तरपणे देण्यात आलेली आहे. पूर्नरचना मान्यतेसाठी सादर..<br>**निर्णय** — शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचा पूर्नेरचित अभ्यासक्रम हा 32 श्रेयांकाचा असेल. त्यातील 20 श्रेयांक सैध्दांतिक भागास (प्रत्येक विषयास 4 श्रेयांक) आणि 12 श्रेयांक प्रात्यक्षिक कार्यास असतील. सैध्दांतिक विषयासाठी अंतर्गत व बहिस्थ कार्यास 20 :80 असा भारांश असेल. प्रत्येक अभ्यास विषयाला 100 गुण असे एकूण 500 गुणाची अंतिम परीक्षा असेल आणि 200 गुण अंतर्गत कार्यास असतील. त्यातील 100 गुण प्रात्यक्षिकास (प्रत्येक विषय प्रात्यक्षिकास 20 गुण) आणि कृतीसंशोधन अहवाल मूल्यमापनास 100 गुण आणि 100 गुणांची संयुक्त मौखिक परीक्षा असेल. उत्तीर्णतेसाठी प्रत्येक विषयात 40% गुण व एकत्रित 50% गुण आवश्यक असतील. या सर्व बदलासह शालेय व्यवस्थापन पदविकेच्या पूर्नरचित अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली. आणि सदर विषय विद्वत परिषदेपुढे पाठविण्याची शिफारस करण्यात आली.<br>**B. शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या निकाला संदर्भातील केसची चर्चा व निर्णय**<br>**टिप्पणी : श्री. ज्ञानदेव बाळासाहेब हांडोरे** हे या शिक्षक्रमाच्या सन 2017-18 तुकडीचे विद्यार्थी आहेत. त्यांचे कृतिसंशोधन मूल्यमापन बहिस्थ परीक्षकाद्वारे करण्यात आलेले नाही. परंतु अभ्यासकेंद्राने अंतर्गत गुण म्हणून 50 पैकी 40 गुण दिल्यामुळे ते उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी कृतिसंशोधनाची मौखिक परीक्षा घेण्याची मागणी केलेली आहे. ऑनलाईन परीक्षा अर्ज भरुन अभ्यासकेंद्रावर कृतीसंशोधनाबाबत मौखिक परीक्षा घेऊन निकाल जाहीर करण्यास मान्यतेसाठीसादर<br>**निर्णय -** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाचे विद्यार्थी श्री. ज्ञानेश्वर बा. हांडोरे हा विद्यार्थी मौखिक परीक्षा न देता पास झाल्याचे आढळले ह्याचा अर्थ MKCL कडे ह्या शिक्षणक्रमासंदर्भात देण्यात आलेली मुल्यमापन योजनेत त्रुटी आहे ती दुरुस्त करण्यात यावी आणि सदर विद्यार्थ्याची मौखिक परीक्षा घेऊन निकाल जाहीर करावा असा निर्णय घेण्यात आला. आणि सदर विषय विद्वत परिषदेपुढे पाठविण्याची शिफारस करण्यात आली. |
| | 51.4.5 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 08**<br>**विषय :** - स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C-32) शिक्षणक्रमाचा पूर्नेरचित केलेल्या मूलभूत व प्रगत शिक्षणक्रमांच्या पाठ्यक्रमांना मंजूरी देणे.<br>**टिप्पणी :** स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची पूर्नरचना करण्यात आलेली आहे. शिक्षणक्रमाचे नांव स्वयंसहाय्य प्रेरक प्रेरिका शिक्षणक्रम न ठेवता स्वयंसहाय्यतासमूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम असे करण्यात आलेले आहे. मूलभूत आणि प्रगत असे दोन स्तरातील प्रमाणपत्र शिक्षणक्रम विकसित करण्यात आलेले आहेत. मूलभूत स्तर- प्रवेश पात्रता इयत्ता 10 वी पास, प्रगत स्तर प्रवेश पात्रता पदवीधर असा बदल करण्यातआलेला आहे.<br>श्रेयांक-16 श्रेयांक (8 तात्विक + 8 प्रात्यक्षिक) अभ्यासक्रमाच्या नावात बदल करण्यात आलेले आहे. सदर बदल मान्यतेसाठी सादर |

| | | |
|---|---|---|
| | | **निर्णय** — स्वयंसहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C-32) शिक्षणक्रमाच्या पूर्नरचित मुलभुत प्रगत शिक्षणक्रम पाठ्यक्रमांना मंजूरी देण्यात आली. मात्र मुलभुत प्रमाणपत्र शिक्षणक्रमातील विषय -1 घटक क्र.5 चे नांव भागीदार संस्था ऐवजी सहाय्यता संस्था / आधार संस्था ह्यापैकी ठेवावे. तसेच ह्या घटकात बहुउद्देशिय संस्था व सहकारी संस्था ह्यांचाही समावेश करावा असे सूचित करुन सदर विषय विद्वत परिषदेपूढे ठेवण्याची शिफारस करण्यात आली. |
| | 51.4.6 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 09**<br>**विषय :** - कायदेविषयक जाणीव जागृती प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणे.<br>**टिप्पणी :** शैक्षणिक व सामाजिक कायदे प्रमाणपत्र शिक्षणक्रमाअंतर्गत प्रामुख्यांनीपुढील बाबींची शिक्षक, पालक व समाजसेवीसाठी सुलभता यावी म्हणून (1) शिक्षण हक्क कायदा, (2) मानवाधिकार कायदा (3)महिला व बाल कल्याण विषयक कायदे (4) अन्य सामाजिक कायदे, नियम व परिपत्रकें (5)न्यायालयीन व अर्धन्यायालयीन प्रक्रियेसंदर्भातील प्राथमिक माहिती इ. संदर्भात मुद्रित स्वरुपात ज्ञान ह्या मध्ये देण्यात येईल.<br>या शिक्षणक्रमात प्रात्यक्षिके, केस स्टडी इ. चा अंतर्भाव करण्यात येईल. त्याकरिंता महाराष्ट्रातील विधीतज्ज्ञांना निमंत्रित करुन शिक्षणक्रमाचे सविस्तर प्रारुप तयार केले जाईल.<br>**निर्णय** — ह्या विषयासंदर्भात शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेमध्ये निमंत्रित केलेले अँडव्होकेट बाबर ह्यांनी सादरीकरण केले, त्यानंतर सदर विषय गरजेचा आहे परंतू शैक्षणिक व सामाजिक कायदे शिक्षण, शिक्षणशास्त्र ऐवजी सामाजिक शास्त्र ह्या विषयांन्तर्गत येऊ शकेल असे मत व्यक्त करण्यात आले. |
| | 51.4.7 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 10**<br>**विषय :** - घरकामगार कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासकेंद्र मानधन वितरण तक्ता चर्चा व निर्णयार्थ<br>**टिप्पणी :** अभ्यासकेंद्रावरील विविध कार्यासाठी मानधन वितरण करावे लागते त्याबाबत घटकनिहाय मानधन तक्ता सहपत्र 7 मध्ये देण्यात आलेला हे. तो मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय** - घरकामगार कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासकेंद्र मानधन वितरण सहपत्र 07 मधील तक्त्यास मान्यता देण्यात आली. सदर विषय विद्वत परिषदेपुढे ठेवण्याची शिफारस करण्यात आली. |
| | 51.4.8 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 11**<br>**विषय :** - शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांच्या मूल्यमापकांना/ प्राश्निकांना मंजूरी घेणे<br>**टिप्पणी :**<br>**निर्णय** - बी.एड. एम.ए. (शिक्षणशास्त्र), शालेय व्यवस्थापन पदविका, बालशिक्षण, मूल्यशिक्षण, स्वयंसहाय्य गट बांधणी, आशययुक्त अध्यापन पध्दती, बी.एड. विशेष इ. सर्व शिक्षणक्रमांच्या सहपत्र 8 मधील प्राश्निक व मूल्यमापकांना मान्यता देऊन सदर विषय विद्वतसभेपुढे ठेवण्याची शिफारस करण्यात आली. |
| | 51.4.9 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 12**<br>**विषय :** - शिक्षणक्रमनिहाय उत्कृष्ट अभ्यासकेंद्र पारितोषिक योजना चर्चा व मान्यतेसाठी-<br>**टिप्पणी :** शिक्षणक्रमनिहाय उत्कृष्ट अभ्यासकेंद्र पारितोषिक योजना चर्चा व मान्यतेसाठी सादर- शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्वच शिक्षणक्रमाच्या गुणात्मक प्रतिपालनाचा भाग म्हणून केंद्राला प्रोत्साहन मिळावे. त्यांच्यात निकोप कार्यानंदाची जाणिव जागृती व्हावी याकरीता आदर्श अभ्यासकेंद्र पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केल्यास संमंत्रकाला व अन्य भौतिक मानवी सेवा |

| | | |
|---|---|---|
| | | सुविधा मध्ये गुणात्मक वृध्दी होईल, या करीता ही योजना कार्यान्वित करण्याचा मानस आहे. यासाठी सविस्तर प्रश्नावली तयार केली जाईल....<br>**निर्णय** - शिक्षणक्रमनिहाय उत्कृष्ट अभ्यासकेंद्र पारितोषिक योजना तयार करुन ती कार्यान्वित करण्याचा विचारास तत्वत: मान्यता देण्यात आली. मात्र त्यासाठी एक मूल्यमापन श्रेणी तयार करावी. तसेच जमा केलेली केंद्रांची माहिती ही पारदर्शक असावी. असे सुचित करुन संपूर्ण योजना पूढील सभेपूढे सविस्तर मांडावी .असा निर्णय घेण्यात आला. |
| | 51.4.10 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 13**<br>**विषय** : - बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र पूर्नरचित शिक्षणक्रम अभ्यासक्रम चर्चा व मान्यतेसाठी सादर -<br>**टिप्पणी** : बालविकास प्रमाणपत्र पूर्नरचित शिक्षणक्रम अभ्यासक्रम चर्चा व मान्यतेसाठी सादर. बालविकास प्रमाणपत्र पूर्नरचित शिक्षणक्रम अभ्यासक्रम तज्ज्ञ सल्लागार समितीत तयार करण्यात आलेला आहे. तो. सहपत्र 9 मध्ये देण्यात आलेला आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय** - बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र पूर्नरचित शिक्षणक्रम सहपत्र 9 मधील अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली. सदर विषय विद्वत परिषदेपूढे मांडण्यासाठी शिफारस करण्यात आली. |
| | 51.4.11 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 14**<br>**विषय** : - बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र पूर्नरचित शिक्षणक्रमासाठी अभ्यासक्रमनिहाय पाठ्यक्रम विकसन समितीस चर्चा व मान्यतेसाठी<br>**टिप्पणी** : पूर्नरचित बालविकास प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी पाठ्यक्रम विकसन समिती विकसित करण्यात आली असून ती सहपत्र 10 मध्ये चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय** - बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र पूर्नरचित शिक्षणक्रमासाठी अभ्यासक्रमनिहाय पाठ्यक्रम विकसन समितीमध्ये विद्याशाखेतील सर्व प्राध्यापकांचा समावेश करावा ह्या सुचनेसह सहपत्र 10 मधील नावांना मान्यता देण्यात आली. सदर विषय विद्वत परिषदेपुढे ठेवण्याची शिफारस करण्यात आली. |
| | 51.4.12 | **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2019/ 15**<br>**विषय** : - अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने ऐनवेळी येणारे विषय<br>**टिप्पणी** : श्रीमती भालेराव ह्यांचा बायोडाटा बाबत....<br>**निर्णय** -<br>1. मधूरा गिरीश भालेराव (एम.ए.स्पेशल) ह्यांना बी.एड. विशेष शिक्षणक्रमाचे लेखक म्हणून मान्यता देण्यात आली.<br>2. स्वयंसहाय्य प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या लेखक संपादकीय यादीतील नावास मान्यता देण्यात आली. तसेच या यादीमध्ये विद्याशाखेतील सर्व प्राध्यापकांच्या नावांचा समावेश करावा, या सूचनेसह सदर यादीस मान्यता देण्यात आली. |

शेवटी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

डॉ. संजीवनी महाले
सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

डॉ. कविता साळूंके
प्रसंचालक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा